# Punyanagari

## ical students from all over the country unite against the government

**Date: 27/08/2013 | Edition: Mumbai | Page: 5 | Source: Bureau | Clip size (cm): W: 10 H: 20**

Clip: 1 of 1




देशभरातील डॉक्टरांनी एकत्र येऊन सरकारचा निषेध केला.

# देशभरात मेडिकलचे विद्यार्थी सरकारविरोधात एकत्र

**मुंबईत ३०० विद्यार्थी**

**। मुंबई :** पदवी आणि पदव्युत्तर मेडिकल अभ्यासक्रमाच्या जागांमधील असमानतेच्या विरोधात तसेच डॉक्टरांना वाचवा या घोषणा देत देशभरातील डॉक्टरांनी भारतीय वैद्यकीय महामंडळ संघटनेच्या नेतृत्वाखाली देशभरातील डॉक्टरांनी सरकारचा निषेध केला. रुग्णालयांत प्रशिक्षण काळातील पांढरा कोट घातलेल्या पोषाखातच आणि काळ्या रिबीन बांधून डॉक्टरांनी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचा तीव्र निषेध केला.

मुंबईत सरकारचा विरोध करण्यासाठी तीनशे डॉक्टर एकत्र आले होते. देशभरात बंगळुरू, जयपूर, हैदराबाद, म्हैसूर, गुवाहाटी आणि हिस्सार या राज्यांमध्ये डॉक्टरांनी सरकारचा निषेध केला. डॉक्टरांना वाचवा या संदेशाबरोबरच देशभरात विशेषज्ज्ञ डॉक्टरांची संख्या कमी असण्याला केंद्र सरकारच जबाबदार आहे, असे संदेश मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी तयार केले होते. यातील प्रत्येक शब्द मेणबत्ती पेटवून या डॉक्टरांनी प्रकाशित केला होता. स्त्रीरोगतज्ज्ञ, ऑर्थोपिडिक्स यांसारख्या विशेषज्ञ डॉक्टरांची संख्या देशभरात कमी झालेली आहे. कारण मेडिकलसाठीच्या जागाच उपलब्ध नसल्यामुळे अनेक विद्यार्थी मेडिकलला प्रवेश मिळण्यापासून वंचित राहतात. मेडिकलच्या प्रवेशप्रक्रियेत बदल करण्यासाठीच आमची ही चळवळ असल्याचे डॉ. तेहरान यांनी सांगितले. श्वसनरोग, डायरिया, क्षयरोग, हृदयरोग यासारख्या आजारांनी देशात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर रुग्णांचा मृत्यू होतो. याचे कारण म्हणजे त्यांच्या उपचारासाठी डॉक्टरच उपलब्ध नसणे. याला मेडिकलच्या जागाच उपलब्ध नसणे हे मुख्य कारण असल्याचे डॉक्टरांनी म्हटले आहे.

### ग्रामीण भागात प्रॅक्टीससाठी नकार

**बरीच वर्षे वैद्यकीय शिक्षण घेण्यात जातात. त्यामुळे डॉक्टरांना ग्रामीण भागात प्रॅक्टीस करण्यास पाठविण्याला विरोध असल्याचे भारतीय वैद्यकीय महामंडळाने म्हटले आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या परीने करिअर करण्याची संधी द्यायला हवी. हे लक्षात घेत सरकारने काढलेला हा नियम अमान्य असल्याचे डॉक्टरांनी म्हटले आहे.**